शुक्रवार, दि. १४ नोव्हेबर २०२५ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक ८१ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
MEDICAL मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
# युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## बालमित्र करत आहेत स्थलांतरित कुटूंबातील मुलांना शिक्षण प्रवाहात ठेवण्याचे मोलाचे काम - जिल्हाधिकारी आशिमा मित्तल

**जालना । प्रतिनिधी** - जिल्ह्यातील ऊस तोडणी व अन्य कामासाठी ग्रामीण भागातील नागरिक ऊसतोडणी व इतर मजुरीच्या कामांसाठी इतरत्र स्थलांतर करतात. स्थलातरावेळी काही पालक म ुलांना सोबत घेऊन जातात तर



काही पालक गावातच आपल्या नातेवाईक किंवा घरातील वृद्धांकडे मुले सांभाळण्यासाठी ठेवतात व सर्व मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात कायम ठेवण्याचे काम 'बालमित्र' करत आहेत असे प्रतिपादन जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आज युनिसेफ, सेक्रेड व स्वराज्य संस्थेमार्फत आयोजित 'मनाचा कट्टा' कुटुंब आधारीत बालसंगोपन व्यवस्था प्रकल्प राबविणाऱ्या बालमित्रांद्वारे (युवा स्वयंसेवक) वापरल्या जाणाऱ्या मनोसामाजिक संचाचे वाटप कार्यक्रमात त्या बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद जालना मिन्नू पी. एम. , उप जिल्हाधिकारी सामान्य नम्रता चाटे, युनिसेफचे राज्य बाल संरक्षण प्रमुख श्रीमती अल्पा वोरा, युनिसेफचे राज्य म ानसिक स्वास्थ्य तज्ञ तनुजा बाबरे, सेक्रेड संस्थेचे संचालक रवि केळगावकर, स्वराज्य संस्थेचे संचालक भाऊसाहेब गुंजाळ यांची उपस्थिती होती.

यावेळी पुढे बोलताना जिल्हाधिकारी आशिमा मि त्तल म्हणाल्या की, युनिसेफ, सेक्रेड व स्वराज्य संस्थेमार्फत उसतोडणी व अन्य कामासाठी कुंटुंबे स्थलांतरित होणाऱ्या मुलांसाठी बालमित्र महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. यात ते जे विद्यार्थी स्थलांतरित होणाऱ्या पालकांसोबत न जाता गावातच वृद्ध आजी आजोबा, नातेवाईकांकडे राहतात यांना विविध शैक्षणिक, मानसिक खेळाच्या माध्यमातून त्यांचे शिक्षण चालू ठेवतात.ही खरोखर अभिमानाची बाब असून प्रशासन सर्वोतोपरी या कार्यक्रमात सहभागी होईल. यापुढे जालना जिल्ह्यातील एकही मुल शिक्षणापासून वंचित राहणार नाही याबाबत सर्व यंत्रणेनी दक्षता घ्यावी.

यावेळी जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती पी. एम. मिन्नू मार्गदर्शन करतांना म्हणाल्या की, जालना जिल्हात उसतोडणी व अन्य काम ासाठी स्थलांतरित होणाऱ्या पालकांच्या मुलांना शिक्षण प्रवाहात कायम ठेवण्याचे काम करणारे बालमित्र हे खरोखर देशाचे सामाजिक परिवर्तनकार आहेत.

जालना जिल्ह्यातील आजमितीस युनिसेफ, सेक्रेड व स्वराज्य संस्थेमार्फत घनसावंगी, अंबड, बदनापूर, परतुर, भोकरदन, जालना तालुक्यातील २६० गावांमध्ये ६०० बालमित्रांच्या माध्यम ातून स्थलांतरित झालेल्या पालकांच्या मुलांना गावातच शिक्षण, आरोग्य, पोषण या बाबींवर काम करत आहे.

मनाचा कट्टा किट या समुदायाधारित मानसिक आरोग्य व मनो-सामाजिक सहाय्य (चक्झडड) साधनाचा समावेश असलेली किट आहे. हा उपक्रम सध्या जिल्ह्यातील ६० ग्राम पंचायतींमध्ये सुरू आहे. या उपक्रमाअंतर्गत मुलांना आणि मुलांची काळजी घेणाऱ्या कुटुंबातील इतर व्यक्तींना तणाव कमी करण्यासाठी आणि भावनिकदृष्ट्या सक्षम राहण्यासाठी विविध उपयुक्त साधने व उपक्रम उपलब्ध करून दिले आहेत. यातील साहित्यामुळे हंगामी स्थलांतरामुळे भावनिक किंवा व्यवहारिक अडचणींना साम ोरे जाणाऱ्या मुलांना आणि त्यांच्या पालकांना/संरक्षकांना मदत मिळणार आहे.

## टेंभुर्णी - कुंभारझरी रस्ता बनला मृत्यूचा सापळा

### ऊस वाहतूक आणि वाढती रहदारी यामुळे अपघातामध्ये वाढ



**विशाल देशमुख**

**टेंभुर्णी -** कुंभारझरी रस्ता नेहमीच काही ना काही कारणाने नजरेत असतो रस्त्याचे झालेले अरुंद काम, रस्त्यांच्या दुतर्फा बोकाळलेली झाडे, सतत जड वाहतूकीमुळे रस्त्याचे होत असलेले नुकसान या ना अशा कित्येक रस्त्या संदर्भात प्रश्न कायम जनतेसम ोर आवाहन म्हणून उभे आहे, वारंवार सार्वजनिक बांधकाम विभागाच्या निदर्शनास आणून देऊनही परिस्थीती जैसे थेच..!

कुंभारझरी रस्ता हा मराठवाडाविदर्भ जोड रस्ता अतिशय महत्त्वाचा असुन सुद्धा रस्त्यांच्या समस्या कायम निरुत्तर..! या रस्त्यावर दिवस रात्र वाहतूक सुरू असते, कुंभारझरी येथे बँक वॉटर पॉईंट असल्याने यासंदर्भातील सर्व अधिकारी कर्मचारी याच अरुंद रस्त्यावर,याचबरोबर या रस्त्यावर खानापूर,काळेगाव,कुंभारझरी, डोलखेडा,पापळ,कचनेरा, वरखेडा,सावरगाव म्हस्के, भातोडी, विदर्भातील ख. गव्हाण, सिनगांव जहागीर आदी गावांची वाहतूक ही नेहमीच कोंडी निर्माण करणारी असून सध्या परिसरातील ऊस तोड सुरू असून अरुंद रस्ता, ठीक ठिकाणी पडलेले गुडघा भर मोठ मोठे खड्डे,वाहतुकी साठी ट्रक व डबल ट्रॉली ट्रॅक्टर अतिशय मृत्यूला **पान २ वर**

युवा आदर्श

**ल लफडे ...**

**काहींना अशी सवय**
**शोधून काढा लफडे**
**अनावृत करावे दोष**
**फाडून काढा कपडे**
**घरात राहिले पुरावे**
**आरोप पडले तोकडे**
**माहीत असते त्यांचे**
**कुणी ना करे वाकडे**
**धुराळा उठवा असा**
**चर्चा जिकडे तिकडे**
**पोलिसांत ना तक्रार**
**धाव घेतात प्रेसकडे**
**चेहरे सारे प्रश्नांकित**
**ना उलघडे का कोडे**
**भेटना घेई प्रत्यक्षात**
**फोटोवर मारता जोडे**
**काळीमा फासे एका**
**प्रसिद्धी प्रकाशी वेडे**
**रात्रीच्या अंधारा पुन्हा**
**तडजोड वेगळी घडे**
**वेळ आहे वायफाळ**
**उभारत रहायचे लढे**
**वैध योग्य मार्ग अनेक**
**तरी ही जाहीरते लढे**
**रोजचा नवीन बकरा**
**का सवय विचीत्र जडे**
**सामाजिक कार्यकर्ते**
**स्व प्रतिमेस जाई तडे**

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

## जालना जिल्हा रुग्णालयात रक्तसाठा तुटवडा; नागरिकांना रक्तदानासाठी जिल्हा शल्य चिकित्सकांचे आवाहन

### थॅलेसिमिया, गरोदर माता, कर्करोगग्रस्त आणि इमर्जन्सी रुग्णांसाठी रक्तदान अत्यंत आवश्यक

**जालना । प्रतिनिधी** - जिल्हा सामान्य रुग्णालय, जालना येथे सध्या रक्तपेढीतील रक्तसाठा अत्यंत कमी झाल्याने गंभीर रुग्णांवर उपचार करताना अडचणी निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे जिल्हा शल्य चिकित्सकांनी नागरिकांना पुढाकार घेऊन स्वेच्छेने रक्तदान करण्याचे आवाहन केले आहे. दररोज शेकडो रुग्ण विविध आजारांसाठी जिल्हा रुग्णालयात दाखल होत असतात. त्यात थॅलेसिमिया सारख्या अनुवांशिक रक्तविकाराने ग्रस्त मुले, गरोदर माता, अपघातग्रस्त तसेच कर्करोग पीडित रुग्णांना नियमि तपणे रक्ताची आवश्यकता असते. परंतु सध्या रक्तपेढीत साठा कमी झाल्याने अनेकांना वेळेवर रक्तपुरवठा करण्यात अडचणी येत आहेत.

**रक्तदानाचे महत्त्व**

रक्तदान हे सर्वात मोठे म ानवतावादी कार्य मानले जाते. एका व्यक्तीच्या रक्तदानामुळे तीन जणांचे प्राण वाचवले जाऊ शकतात. रक्तदानामुळे समाजात जीवदान देण्याचा अनमोल संदेश पसरतो. तसेच नियमित रक्तदान केल्यास रक्तदात्याच्या शरीरात नवीन रक्तनिर्मिती होऊन आरोग्य सुदृढ राहते. जिल्हा शल्य चिकित्सकांनी सांगितले की, रक्तदान ही फक्त सामाजिक जबाबदारी नसून ती मानवतेची खरी सेवा आहे. आज जालन्यातील रक्तपेढीसमोर निर्माण झालेल्या तुटवड्याच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी पुढे येऊन आपल्या थोड्याशा वेळेने एखाद्याचा जीव वाचवावा.

**रक्तदानासाठी वेळ आणि ठिकाण**

इच्छुक नागरिकांनी दररोज सकाळी ९ ते दुपारी १ या वेळेत जिल्हा सामान्य रुग्णालय, जालना येथील रक्तपेढीत प्रत्यक्ष हजर राहून रक्तदान करावे. रक्तदानाची प्रक्रिया पूर्णपणे सुरक्षित असून प्रशिक्षित वैद्यकीय कर्मचारी त्यात सहभागी असतात. रक्तदानापूर्वी तपासणी केली जाते आणि पात्र असल्यासच रक्त घेतले जाते.

**कायमस्वरूपी दात्यांची गरज**

वैद्यकीय तज्ञांच्या मते, रक्तपेढीतील साठा कायम स्वरूपी टिकवून ठेवण्यासाठी नियमित रक्तदात्यांचा सहभाग आवश्यक आहे. अनेकदा सण-उत्सव किंवा सुट्ट्यांच्या काळात रक्तसाठा घटतो, त्याम ुळे नागरिकांनी वर्षातून किमान दोनदा रक्तदान करण्याचा संकल्प करावा. सध्या जालन्यातील थॅलेसिमिया रुग्णांना आठवड्यातून एक ते दोन वेळा रक्ताची गरज भासते. गरोदर मातांसाठी प्रसुतीदरम्यान तातडीने रक्त आवश्यक असते, तसेच अपघातग्रस्त आणि शस्त्रक्रियेसाठी येणाऱ्या रुग्णांचे प्राण वाचवण्यासाठी रक्तदान अपरिहार्य ठरते. त्यामुळे नागरिक, सामाजिक संस्था, स्वयंसेवी संघटना आणि तरुण मंडळांनी एकत्र येऊन रक्तदान हेच जीवनदान हा संदेश व्यापकपणे पसरवावा आणि जिल्हा रुग्णालयाच्या रक्तपेढीसाठी रक्तसाठा वाढवावा, असे आवाहन जिल्हा शल्य चिकित्सकांनी केले आहे.

## नळविहीरा जिल्हा परिषद शाळेला स्मार्ट अँड्रॉइड टीव्ही संच भेट

**विशाल देशमुख**

**टेंभूर्णी -** मुंबई येथील चंद्रकांत सुखदेव खरात यांच्या वतीने शाळेचे शिक्षक विनोद कळंबे यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत त्यांच्या दिवंगत आजी स्व.सरूबाई दौलत गायकवाड यांच्या स्मृतिप्रित्यर्थ जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा नळविहीरा शाळेला ४३ इंची स्मार्ट अँड्रॉइड टीव्ही संच भेट म्हणून देण्यात आला. यावेळी आयोजित कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष शंकर गाडेकर होते तर यावेळी सरपंच सोपानराव जंजाळ, चंद्रकांत खरात, एल. आय.सी. चे अंकुश आढावे,शंकर धनवई,अंकुश गाडेकर,सुनील गायकवाड, प्रल्हाद गाडेकर, सुनील मोरे, अमोल मोरे, वसंता गाडेकर,देवराव कोल्हे, नंदू गाडेकर,विलास गाडेकर, परमेश्वर मोरे मनोहर जंजाळ, परसराम गाडेकर यांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी बोलताना सुनिल गायकवाड म्हणाले की दानशूर व्यक्तींच्या माध्यमातून जिल्हा परिषद शाळेमध्ये भौतिक सुविधा उपलब्ध होत असल्याने याचा निश्चितच विद्यार्थ्यांना फायदा होणार आहे. शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष शंकर गाडेकर म्हणाले की स्मार्ट टीव्हीच्या माध्यमातून विद्यार्थी अधिक प्रभावीपणे शिकतील. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि सूत्रसंचलन विनोद कळंबे यांनी केले. कार्यक्रम ासाठी मुख्याध्यापक शिवहरी नागरे, काशिनाथ उखर्डे, ज्ञानेश्वर झगरे, मंजुषा बकतकार,पूजा गहेरवाल यांनी परिश्रम घेतले.




## कुमार जिल्हा अजिंक्यपद कबड्डी निवड चाचणी स्पर्धेचे आयोजन

**विशाल देशमुख**

**टेंभूर्णी -** जालना जिल्हा कबड्डी असोसिएशन यांच्या व शिवशक्ती क्रीडा मंडळ टेंभुर्णी यांच्या संयुक्त विद्यमाने २५ नोव्हेंबर २०२५ ते २९ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत पुणे येथे होणाऱ्या कामर कुमारी राज्य अजिंक्यपद कबड्डी निवड चाचणी स्पर्धे साठी जालना जिल्हा कुमार अजिंक्यपद कबड्डी स्पर्धेचे आयोजन शनिवार दिनांक १५/११/२०२५ रोजी सकाळी ठीक १०.00 वाजता स्थळ : कडूबा सपकाळ क्रीडा नगरी ,जाफराबाद रोड क्ष्झ पेट्रोल पंप च्या जवळ, टेंभुर्णी ता. जाफ्राबाद करण्यात आलेले आहे तरी जिल्ह्यातील पात्र खेळाडूंनी मुलांनी या स्पर्धेत मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आव्हान जालना जिल्हा कबड्डी संघटनेचे संस्थापक सचिव नंदकिशोर खर्डेकर अध्यक्ष माधवीताई काळे उपाध्यक्ष अक्षय गोरंटयाल, डॉ देवेश पाथ्रीकर सचिव प्रशांत तेलगड यांनी केले आहे

या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी खेळाडूंचे वजन ७५ किलो ग्रॅम खालील व वय २० वर्षाखालील असावे जन्मतारीख १८. 0१. २००६ किंवा त्यानंतरची असावी



**वयाच्या दाखल्याबाबत महत्त्वाची सूचना**

१)यु डायस नंबर व स्टुडन्ट आयडी असलेला बोनाफाईड व निर्गम उतारा मुख्याध्यापक यांनी अर्धसाक्षांकित केलेला असावा २) आधार कार्ड (ओरिजनल अद्यावत केलेले असावे)

३)पासपोर्ट साईज चार फोटो अधिक माहितीसाठी संघटनेचे सदस्य राहुल वाहुळे, बाबासाहेब मंडाळे, संजय येळवंते, रवींद्र ढगे, राजूभाऊ थोरात, संतोष नागवे, यांच्याशी संपर्क करावा. स्पर्धा संदर्भात ओमराज उखर्डे ९६0७२६७६५१, सोमेश मघाडे ७६२0४८१३२३, कृष्णा बेंद्रे ८४८५८ ४0१९४ यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

संपादकीय पान

# शेतकऱ्यांकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलवा

गेल्या तिन-चार महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकरी, शेती, पिके आणि एकूणच परिस्थिती चे विदारक चित्र डोळ्यासमोर उभे आहे.शेतकरी हतबल झाला आहे. अनेक ठिकाणी दिवाळीपूर्वी तातडीची मदत दिली गेली बऱ्याच ठिकाणी ती मिळाली नाही म्हणून बातम्या वाचल्या आहेत. सरकारने मदत केली आहे. मुख्यमंत्र्यांनीच एकूण परिस्थितीचा आढावा घेतल्यानंतर म्हटले आहे की नुकसानीचे चित्र विदारक असून विचारापलीकडचे आहे. खूप मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. इतकी नुकसान भरपाई देणे शक्य नाही.

निवडणुकीत निवडून आल्यावर सातबारा कोरा करण्याचे आश्वासन दिले होते.

निवडणुकीनंतर कर्जमाफीचा तो विषय प्रलंबितच होता. योग्यवेळी कर्जमाफी केली जाईल असेही हे म्हटले होते. तेव्हा आता तरी शेतकऱ्याला सातबारा कोरा करण्याचे आश्वासन पूर्ण करा अशी मागणी मोठ्याप्रमाणात झाली. परंतु त्यावरही काही निर्णय नसल्यामुळे बच्चू कडूंनी आंदोलनाचा पवित्रा घेतला आणि शेवटी मुख्यमंत्री, व दोघांमध्ये चर्चा होऊन ३० जून पर्यंत कर्जमाफी करण्याचे आश्वासन दिले गेले. कर्जमाफी प्रक्रीयेला अजून सात ते साडेसात महिने अवकाश आहे. तोपर्यंत शेतकऱ्याला वाट बघणे हेच नशिबात आहे. एक एप्रिल पासून शेतकऱ्यांना नवीन खरीप कर्ज वाटप सुरू होते. ३० जून पर्यंत कर्जमाफी प्रक्रिया पार पडल्यास त्यांना नवीन कर्ज मिळू शकते. नविन कर्ज मिळण्यासही विलंब लागणार आहे. तोपर्यंत पेरणीची वेळ येते. त्यामुळे मशागतीसाठी बी बियाणे खतासाठी त्याला पैसा उभा करणे ही समस्या आहेच.

गेला अनुभव बघता बऱ्याच अंशी पीक विमा रकमा मिळाल्या नाही. नियमित कर्ज भरणाऱ्यांना प्रोत्साहन पर रक्कम मिळाली नाही. बऱ्याच ठिकाणी दह- वीस रुपये पन्नास रुपये अशा विम्याच्या रकमा मिळालेल्याच्या बातम्या आपण वाचल्या आहेत आणि त्याबाबत अनेकांनी आश्चर्य व्यक्त केले आहे. एकूणच शेतकऱ्याकडे,त्यांच्या समस्येकडे, प्रश्नाकडे पाहण्याचा दृष्टिकोन एवढा गंभीरपणे घेतला जात नाही. शेतकऱ्याची केवळ थट्टा केली जात आहे.तोंडसूख घेतले जात आहे. असेच दिसते.

अनेक प्रकारात शेतकऱ्यांचे जखमेवर मीठ चोळल्या जात आहे. ज्याच्या जीवावर अगदी गाव पातळीपासून सहकारी सोसायटी, सहकारी बँका, सहकारी साखर कारखाने, सूतगिरण्या, असे अनेक प्रकल्प उद्योग सुरू आहे अशा मुख्य घटकाकडेच प्रामुख्याने दुर्लक्ष होत आहे.

गेल्या काही वर्षात शेतकरी विषयी काय काय बोललै गेले. शेतकरी दारु पितात, कर्जाची रक्कम घरातच लग्नकार्यात खर्च करून टाकतात, कितीही भाव दिला तरी रडतात साले- तुमच्या अंगावरचा कपडाही तुमच्या बापाने दिला आहे- ढेकळाचे पंचनामे करायचे का? कर्ज घ्यायचं ते थकवायचं परत कर्जमाफी मागायची, परत कर्ज घ्यायचं, परत माफी मागायची, हाच शेतकऱ्याचा उद्योग होवून बसलाआहे..असे राधाकृष्ण विखे पाटील, म्हणतात.. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी तर कळसच गाठला आहे. शून्य दराने कर्ज देत आहे ते नीट भरा काय माफ माफ फुकटात फुकटात लावला आहे. एकदा साहेबांनी माफी केली देवेंद्रजींनी माफी केली एकदा उद्धव सरकारने माफी केली अजून कितीदा माफी हवी.. अशाप्रकारे शेतकऱ्या विषयी भावना व्यक्त केल्या आहेत.

आम्हाला निवडून यायचे होते म्हणून मग आम्ही कर्जमाफी करू अशी आश्वासन दिले. दिले आहे नं,मग आता आश्वासन पूर्ण करा पण त्यासाठी काही हजार कोटी रुपयांची आवश्यकता असते. एकूणच त्यांच्या मनात शेतकऱ्या विषयी काय सहानुभूती आहे हे स्पष्टच होते. शेतकऱ्यांनी आर्थिक शिस्त लावावी असा सल्ला ते शेतकऱ्यांना देतात.

पण आता या चार-पाच दिवसात जे काही घडत आहे त्यावरून आता जनता त्यांना जाब विचारत आहे. आता तुम्हाला फुकट फुकट आणि स्टॅम्प ड्युटी माफ हवी होती का? ती होईल का? २१०० कोटीची जमीन ३०० कोटींना हवी आणि स्टॅम्प ड्युटी पाचशे. अशां फुकट्यांना शेतकऱ्यांविषयी बोलण्याचा काय अधिकार आहे ?शेतकरी वर्गात संतापाची लाट उसळली आहे. शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी, सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी अजित पवारांच्या राजिनाम्याची मागणी केली आहे. निवृत्त न्यायाधीशामार्फत चौकशी करायची मागणी केली आहे.

मुख्यमंत्र्यांनी कर्जमाफीचा निर्णय घेतल्यानंतर आता परत परत कर्जमाफी होणार नाही काही हजार द्यायला लागतात. असे भाष्य करण्याची काही आवश्यकताच नव्हती.

जमीन प्रकरणात राष्ट्रवादीचे प्रवक्ते अमोल मिटकरी म्हणतात पार्थला काही झाले तर हे सरकारच कोसळेल. या वक्तव्यावरून त्याची प्रवक्ते पदावरून हकालपट्टी झाली. वास्तविक पाहता पंतप्रधान आणि मुख्यमंत्री यांचे खूप मोठे उपकारच अजित पवारांवर आहे आणि असे असताना आपले तत्व सोडलेले नाही आणि राज्याच्या विकासासाठी मी सरकारमध्ये आलो असे म्हणतात, कितपत सत्य आहे हे सगळे ? राष्ट्रवादीला सरकारमध्ये घेऊ नये असे म्हटले होते, असे मोहनजी भागवत यांचे वक्तव्य सोशल मीडियावर प्रसिद्ध झाले ते वाचण्यात आले. सोशल मीडियावर आजकाल खूप काही बातम्या प्रसिद्ध होत असतात अर्थातच ते जर म्हणाले असतील तर त्यातील सत्यताही नाकारता येत नाही. आपली सोडवणूक करून घेण्यासाठी आणि सत्तेचा उपयोग करून पक्ष वाढीसाठी बरीच मंडळी भारतीय जनता पक्ष प्रवेश करत आहेत.

आता मागच्या आठवड्यात कर्ज माफी विषयी निर्णय घेतला आणि ३० जून पर्यंत कर्जमाफी करणार जाहीर केले. खरीप हंगाम कर्ज भरण्याची अंतिम ३१ मार्च २०२६ आहे. म्हणजे ते कर्ज त्या दिवशी थकबाकी होणार मग आता ३१ मार्च २०२६ कोणीही शेतकरी ते भरणार नाही. म्हणजे याचा अर्थ आज की ३१ मार्च २५ रोजी ज्याच्याकडे थकबाकी कर्जआहे ते माफ होणार. असाच सरळ अर्थ होतो आणि ३१ मार्च रोजी ज्याच्याकडे कर्ज बाकी आहे ती कर्ज बाकी तीन लाखापर्यंत माफ होणार हीच अपेक्षा सर्वांना आहे.

मागच्या काळात ज्या नियमित कर्जदारांनी कर्ज भरून टाकले त्यांना प्रोत्साहन म्हणून पंचवीस हजार किंवा पन्नास हजार रुपये देणार जाहीर करून दिले नाही. त्यामुळे आता खरीप हंगाम वाटप कर्ज ३१ मार्च रोजी कर्ज कोणी भरणारच नाही आणि ते थकीत होणार हे साहजिकच आहे आणि त्यामुळे ३१ मार्च थकीत कर्ज आहे ते ते माफ होण्याची अपेक्षा शेतकऱ्याला असणार.

खरंतर आता या दोन गोष्टींची गरज आहे एक म्हणजे राजकीय नेत्यांनी शेतकऱ्यांकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलायला हवा आणि दुसरे असेही शेतकऱ्यांनीही राजकीय नेत्यांकडून अपेक्षा ठेवून राहण्यापेक्षा आपल्या हक्कासाठी झगडणे पसंत करावे. त्यासाठी शेतकरी संघटना मजबूत असायला हवी.

कारण सध्या राजकीय पक्ष निहाय शेतकरी विभागणी आहे हा भाजपाचा, हा राष्ट्रवादीचा, हा शिवसेनेचा, हा उबाठा चा, हा काँग्रेसचा, अजूनही त्यातही मराठा समाजातील शेतकरी, हा कुणबी समाजातील शेतकरी, लेवा पाटील शेतकरी, हा ब्राह्मण शेतकरी, म्हणजे झालं असं की शेतकरी सुद्धा पक्ष आणि जातीनिहाय विभागाला गेला आहे. विदर्भातील शेतकरी मराठवाड्यातील शेतकरी पश्चिम महाराष्ट्रातील शेतकरी उत्तर महाराष्ट्र शेतकरी अशाप्रकारे विभागले आहे.

त्यामुळे त्यात एक संघटन नाही. शेतकरी संघटना आहे. त्यातही निरनिराळे विचार प्रवाह आहेत. त्यामुळे तेही एक मजबूत संघटन नाही आणि म्हणूनच शरद जोशी शेतकऱ्यांचे मोठे नेते म्हणून जरी कार्य केले असले तरी ते निवडणुकीत पराभूत झाले.जातीय समिकरणाने त्यांना राजकीय क्षेत्रात स्विकारले नाही असेच म्हणावे लागेल.

मशागती पासून ते उत्पादित पीक घरात येऊन त्याची विक्री होऊन पैसा शेतकऱ्या हातात येईपर्यंत जी सिस्टीम आहे त्यात अमलाग्र बदल होणे आवश्यक आहे ही गोष्ट वारंवार समोर येत आहे. आणि या व्यवस्थेत होणाऱ्या त्रासामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्या मोठ्या प्रमाणावर होत आहे.

सहज कर्जाची उपलब्धता, बियाणे, खते, ची उपलब्धी, त्यातील भ्रष्टाचार, भेसळ थांबवणे, उत्पादित मालाला हमीभाव देणे, शेती साठी असणाऱ्या योजना व्यापक करणे. अनेकदा योजनांमध्ये अनुसूचित जाती जमाती शेतकऱ्यांसाठी असलेल्या योजनात लाभधारक नसतात. तेव्हा अशा योजना जसे शेततळे, विहीर खोदायी ,जुन्या विहिरीचे दुरुस्ती, यासाठी दिले जाणारे अनुदान योजना दहा एकर पर्यंतच्या शेतकऱ्यांसाठी व्यापक प्रमाणावर राबवली जावी. त्या शेतकऱ्यांना ही योजना का लागू होत नाही ? यासंबंधी विचार करावा आणि अनुदान उपलब्धी करून द्यावी. त्यासाठी जाती वर्गाचे बंधन नसावे. थोडक्यात शेतकऱ्याच्या उत्पन्नात वाढ होण्यासाठी ज्या काही योजना आहेत त्यात व्यापकता आणणे गरजेचे आहे. केवळ ठराविकच लोकांना याचा लाभ मिळवून दिला जातो असे होवू नये.

आज ज्या प्रकाराने शेतकऱ्याला लाचार समजून अपमानास्पद बोलून नाउमेद केले जाते हे थांबायला हवे. शेतकऱ्यांन कडे बघण्याचा, बोलण्याचा दृष्टिकोन बदलायला हवा. आज तुम्ही बोलता आणि उद्या तुमच्या खाली फटाका फुटतो.



जे जे बोलतात त्यांनी आत्म चिंतन करा. आपली वाणी बिघडू देवू नका. बळीराजाने नाही केला पेरा... तर काय खाल..? अशी वेळ येवू देवू नका...हेच तुम्हाला सांगणे आहे. तूर्तास एवढेच.

**दिलीप देशपांडे, जामनेर. जि. जळगांव. ८९९९५६६९१७**

## लहान मुले हेच देशाचे भविष्य

वास्तविक जागतिक पातळीवर २० नोव्हेंबरला बालदिन साजरा केला जातो. १९५४ मध्ये संयुक्त राष्ट्र संघाच्या आमसभेने ठरवल्यानुसार, पाहिल्यांदाच बालदिन साजरा करण्यात आला. सर्व देशांनी लहान मुलामुलींमध्ये सांप्रदायिक आदान-प्रदान व विविध संप्रदाय वा धर्माबाबतचे सामंजस्य वाढवणे तसेच जगभरातील मुलामुलींचे आयुष्य अधिक चांगले बनवण्याची संकल्पना मान्य करून त्यादृष्टीने काम करावे हा त्या मागचा हेतू. २० नोव्हेंबर हीच तारीख निवडण्याचे कारण असे की १९५९ मध्ये याच तारखेस संयुक्त राष्ट्र संघाच्या आमसभेने बाल हक्कांची सनद स्वीकारली. शिवाय १९८९ मध्ये याच दिवशी बाल हक्कांच्या मसुद्यावर सह्या झाल्या. हे हक्क आतापर्यंत १९१ देशांनी मान्य केले. भारतात मात्र १४ नोव्हेंबर रोजी बालदिन साजरा केला जातो. कारण भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांचा हा जन्मदिवस. १४ नोव्हेंबर १८८९ रोजी अलाहाबाद येथे पंडित जवाहरलाल नेहरू यांचा जन्म झाला. पंडित नेहरूंना लहान मुले खूप आवडायची. ते सतत लहान मुलांच्या गराड्यात असायचे. लहानमुले हेच देशाचे भविष्य आहे. आजचा बालक उद्याचा नागरिक आहे. तो नेहमी आनंदी, उत्साही आणि सुरक्षित असायला हवा. देशातील लहान मुले सुरक्षित तर देश सुरक्षित असे ते नेहमी म्हणत. मुलामुलींना सुरक्षित आणि प्रेमाच्या वातावरणात वाढवले गेले पाहिजे तसेच त्यांना आपले आयुष्य फुलवण्याच्या आणि पर्यायाने देशाच्या विकासात भर घालण्याच्या समान संधी मिळाल्या पाहिजेत असे त्यांचे मत होते. पंडित नेहरू हे स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान होते. पंडित नेहरूंना बालकांविषयी वाटणाऱ्या प्रेमाची आठवण म्हणून हा दिवस बालदिन म्हणून साजरा केला जातो शिवाय पंडित जवाहरलाल नेहरूंना मुलांविषयी वाटणाऱ्या प्रेम व जिव्हाळ्याविषयी आदर व्यक्त करण्याचा देखील हा एक मार्ग आहे. बालकांनाही आनंद घेण्याचा, मौजमस्ती करण्याचा हक्क आहे. आजचे बालक हाच देशाचे भविष्य आहे. या बालकांमधूनच देशाचे भावी सुशिक्षित तसेच मनाने आणि शरीराने आरोग्यसंपन्न असे नागरिक तयार होणार आहेत. हा हक्क मिळालेल्या नशीबवान बालकांनी आपल्या आनंदात इतरांनाही सहभागी करून घेण्याची जाणीव ठेवली पाहिजे. पालकांनी ही जाणीव आपल्या मुलांमध्ये रुजवली तर भावी नागरिक सुज्ञ आणि समजूतदार बनतील त्यामुळे देशाचे भविष्य उज्ज्वल होईल. बालदिनाच्या निमित्ताने प्रत्येकाने मुलांच्या कल्याणासाठी काहीतरी करण्याचा संकल्प केला पाहिजे. देशातील सर्व मुलामुलींना बालदिनाच्या हार्दिक शुभेच्छा!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

पान १ वरुन

### टेंभूर्णी - कुंभारझरी ...

आवाहन ठरत आहे सोबतच रस्त्यांच्या दुतर्फा बोकाळलेली मोठ मोठी गर्दी करणारी झाडी आणि वाढलेले गवत अशा परिस्थितीमध्ये समोरून येणाऱ्या वाहनाचा अंदाज न लागता अपघात झालेले सार्वजनिक बांधकाम विभागासह सर्वांनीच अगदी जवळून पाहिले आहे यामध्ये काहींनी आपल्या प्राणाची सुद्धा नाहक आव्हुती द्यावी लागली आहे, या संदर्भात याअगोदर विविध वृत्तपत्रांमध्ये वारंवार शासन दरबारी समस्या मांडली असता सर्व निष्फळ..!

रस्त्यांच्या मधोमध असलेल्या मोठमोठ्या खड्डे जणुकाही येणाऱ्या जाणाऱ्या च्या जीवाशी खेळताना दिसत आहे याकडे सार्वजनिक बांधकाम विभागाने जातीने लक्ष घालून रस्त्यांच्या दुतर्फा बोकाळलेली झाडे, मधोमध असलेली गुडघा भर खड्डे बुजुऊन होणारी वाहतूक कोंडी दूर करावी अशी मागणी परिसरातील नागरिकांनी केली आहे.


## शेतकरी जगला पाहिजे

शेतकरी उभ्या जगाचा पोशिंदा
त्याच्या नशिबी दुष्काळाचा फंदा
कधी अतिवृष्टी तर कधी उन्हाळा
सोसाव्या लागतात दुष्काळाच्या झळा
शेतकरी जगला तर हे जग टिकेल
शेती विना हे जग उपाशी झोपेल
शेतकरी, शेतमजूर जगला पाहिजे
शेतकऱ्यांचा मान वाढला पाहिजे
सरकार शेतकऱ्यांकडे दुर्लक्ष करते
सावकार त्यांना कर्जाच्या खाईत लोटते
शेतकरी सुखात राहिला पाहिजे
सांगून गेले छत्रपती शिवाजी राजे
शेतकऱ्यांना आता वालीच उरला नाही
शेतकऱ्याविना पूर्ण जग उपाशी राही
शेतकरी माझा शेतात राब राब राबतो
दुष्काळ मात्र त्यांना नाराज करून टाकतो
शेतकऱ्यांवर येत आहेत वाईट दिवस
म्हणून पडताहेत शेत शिवार सारे वस
शेतकऱ्यांना शेती करण्यात राहिला नाही रस
देत आहेत शेतकरी सारे नशिबाला दोष
शेतकरी आत्महत्या रोज वाढत आहेत
आत्महत्या करून शेतकरी मोकळे होत आहेत
शेतकऱ्यांची कोणी दखल घेत नाही
शेतकरी आत्महत्या काही टळत नाही
शेतकऱ्यांवर करू नका अन्याय अत्याचार
शेतकरी असतात तलवारीची तळपती धार
एक दिवस करून टाकतील तुम्हाला बेजार
म्हणून शेतकऱ्यांचा करा हो थोडा तरी विचार

**बुद्धभूषण चंद्रकांत कांबळे**
**खंडाळी ता.अहमदपूर जिल्हा लातूर**
**मो.७४९८७१५६६१**

## आधुनिक भारताचे शिल्पकार पंडित जवाहरलाल नेहरू!

पंडित जवाहरलाल नेहरु उर्फ चाचा नेहरू हे भारताचे पहिले पंतप्रधान व भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे अग्रणीय असलेले कॉग्रेसचे लोकप्रिय नेते होते. त्यांचा जन्म १४ नोव्हेबर १८८९ साली अलाहाबाद येथे झाला. चाचा नेहरु मुलांना खुप प्रेम करायचे म्हणूनच त्यांच्या जन्म दिन बालकदिन म्हणून साजरा केला जातो. असे हे चाचा नेहरूविषयी थोडक्यात जाणून घेऊया.



पंडित जवाहरलाल नेहरू यांचे वडीलांचे नाव मोतीलाल नेहरू होते. ते एक सुप्रसिध्द कायदेतज्ञ होते. चाचा नेहरू यांचे प्राथमिक शिक्षण खाजगी शिकवणीद्वारे झाले. ते वयाच्या १५ व्या वर्षी इंग्लंडला शिक्षणासाठी गेले त्यानंतर दोन वर्ष त्यांनी हैरो येथे शिक्षण घेतले. कॅब्रिज विद्यापीठातून त्यांनी सामान्य ज्ञान या विषयात पदवी घेतली.

७ फेब्रुवारी १९१६ रोजी त्यांचा विवाह कमला कोल यांच्यासोबत झाला. १९१७ साली त्यांना इंदिरा प्रियदर्शनी ही कन्या झाली. पंडीत जवाहरलाल नेहरु यांना पहिल्यापासूनच मुलांचा लळा होता. त्यामुळे ते आयुष्यभर मुलांच्या शिक्षणासाठी झटले.

अन्नधान्य तुला करुन साजरा करत असे. पंडीत जवाहरलाल नेहरूंना स्वातंत्र्याची पहिल्यापासूनच आवड होती. ही बाब एका घटनेद्वारे स्पष्ट होते एकदा मोतीलाल नेहरू यांनी पिंजऱ्यात पोपट आणला होता. पोपटाला पिंजऱ्यात पाहून पंडीत जवाहरलाल नेहरू अस्वस्थ झाले व त्यांनी शेवटी पोपटाला पिंजऱ्यातून सोडले. यावरुन ते स्वांतंत्र्याप्रिय असल्याचे समजते.

पंडीत जवाहरलाल नेहरु १९१७मध्ये होमरुल चळवळीत सामील झाले होते. १९१९ मध्ये त्यांची भेट महात्मा गांधीशी झाली आणि त्यांनी राजकारणात प्रवेश केला. त्यांनी गांधीसोबत अनेक आंदोलनामध्ये निगमचे अध्यक्ष म्हणून निवडले गेले. त्यांनी दोन वर्षे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून काम केले. भार-ताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी केलेल्या बंडांमुळे इंग्रजांनी त्यांना अनेकदा तुरुंगात टाकले. १९४१ ते ४६ याकाळात त्यांनी भारत एक खोज या नावाची एक पुस्तकही लिहले. या पुस्तकातून त्यांनी भारताचा इतिहास आपणांस पाहावयास मिळतो.

१९२९ मध्ये कॉंग्रेसच्या वार्षिक अधिवेशन लाहोर येथे भरले होते. या अधिवेशनात पंडीत जवाहरलाल नेहरू यांची कॉग्रेस पार्टीच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली. याबरोबरच त्यांनी १९३०-४० दशकात त्यांनी भारत स्वातंत्र्य करण्यासाठी झालेल्या लढाईत ते प्रमुख मार्गदर्शक होते. भारताला १९४७ साली स्वातंत्र्य मिळाले. यावेळी स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान म्हणून ते निवडून आले. स्वातंत्र्यानंतर ते भारताचे पहिले पंतप्रधान झाले आणि देशाच्या विकासासाठी त्यांनी खूप परिश्रम घेतले. त्यांनी उद्योग, शेती, शिक्षण आणि विज्ञान या क्षेत्रात मोठी प्रगती घडवून आणली. अशा देशासाठी झटणारे व मुलांना प्रेम करणारे पंडीत जवाहर लाल नेहरू व मुलांचे आवडते चाचा नेहरू यांचा १४ नोव्हेबर रोजीचा जन्मदिन देशभरात बालक दिन म्हणून साजरा करण्यात येतो. नेहरूंना मुलांवर खूप प्रेम होते. ते म्हणायचे - आजची मुले ही उद्याच्या भारताची नागरिक आहेत. त्यांच्या वाढदिवसाला म्हणजेच १४ नोव्हेंबरला बालदिन म्हणून साजरा केला जातो.



चाचा नेहरू मुलांचे लाडके,
फुलांप्रमाणे गोड गोड गोडके.
छातीवर गुलाब, चेहऱ्यावर हसू,
मुलांवर प्रेम त्यांचे बसू.
१४ नोव्हेंबर त्यांचा दिवस,
बालदिन साजरा करतो खास!

**शेख अब्दुल रहीम,**
**संस्थापक अध्यक्षः हॅप्पी टू हेल्प फाऊंडेशन**
**सह-शिक्षकः चौधरी शेख मन्नाबी उर्दू प्राथमिक शाळा, छत्रपती संभाजीनगर.**

## सकारात्मक विचार करून उद्योगाची उभारणी करावी - के डी दांडगे



**जालना । प्रतिनिधी -** मिटकॉन या द्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या वतीने जालना येथे आज दि.११ नोव्हेंबर २०२५ रोजी एकदिवसीय उद्योजकीय चर्चासत्र घेण्यात आले.या वेळी के डी दांडगे जिल्हा प्रकल्प अधिकारी मिटकॉन जालना व करण पाटील जाधव यांचे मार्गदर्शन लाभले. यावेळी सचिन सुपारकर,सुरेश गंगातिवरे, सचिन बोर्डे ,सोनु मोरे, सुनील गंगातिवरे, अशोक लाड व वैभव उचाटे ईतरांची उपस्थिती होती .या चर्चासत्रात मार्गदर्शन करताना दांडगे म्हणाले की तरुणांनी सकारात्मक विचार करुन उद्योग, व्यवसाय उभारले पाहिजेत, बाजारपेठेचा सखोल अभ्यास केला पाहिजे नव नवीन संधी निर्माण केली पाहिजे जेणेकरून यशस्वी होता येईल असे सांगितले. या चर्चासत्रात उद्योगसंधी मार्गदर्शन, उद्योग व्यवसाय वाढीसाठी गुणवत्ता, उद्योग प्रेरणा, संघटन कौशल्य, उद्योजकीय गुणसंपदा, व्यक्तीमत्व विकास, प्रभावी संभाषण कौशल्य, उद्योग व्यवस्थापन, जागेची निवड, बाजारपेठ पाहनीतंत्र, शासकीय व निमशासकीय योजना, जिल्हा उद्योग केंद्राच्या विविध योजना,खादीग्राम उद्योग मंडळाच्या योजना, महामंडळाच्या विविध योजना, कृषी संलग्न योजना, प्रकल्प अहवाल तयार करणे, कर्ज प्रस्ताव तयार करणे, बँकेची कार्यप्रणाली, विक्री व्यवस्था, भांडवल उभारणी, मनुष्यबळ, विमा संरक्षण, शासकीय परवाने, लागणारी कागदपत्रे इत्यादी बाबत मार्गदर्शन केले.

अधिक माहिती व मार्गदर्शनासाठी के डी दांडगे ,जिल्हा प्रकल्प अधिकारी, मिटकॉन द्वारा पत्रकार भवन ,एस पी ऑफिस समोर , शासकीय ग्रंथालयाच्या बाजुला, जालना मो.नंबर ९४२३७३०९३२ येथे संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

## शार्दूल ठाकूर मुंबईच्या ताफ्यात

**मुंबई -** भारताचा ऑल राऊंडर क्रिकेटर शार्दूल ठाकूर आयपीएलचा पुढील हंगाम मुंबई इंडियन्सकडून खेळणार आहे. मुंबई इंडियन्सनं लखनौ सुपर जायंटस सोबत ट्रेड डील करत शार्दूल ठाकूरला संघात घेतलं आहे. आता शार्दूल ठाकूर रोहित शर्माच्या साथीनं मुंबई इंडियन्सच्या साथीनं खेळताना पाहायला मिळेल. शार्दूल ठाकूर गेल्या वर्षीच्या मेगा ऑक्शनमध्ये अनसोल्ड राहिला होता. मात्र, लखनौ सुपर जायंटसनं मोहसीन खान जखमी झाल्यानं त्याच्या जागी संघात घेतलं होतं.

मुंबई इंडियन्सनं लखनौ सुपर जायंटस सोबत ट्रेड कील करत संघात सामील करुन घेतलं. मुंबई इंडियन्सनं शार्दूल ठाकूरसाठी २ कोटी रुपये मोजले आहेत. शार्दूल ठाकूरला गेल्या वर्षी लखनौनं २ कोटी रुपयांमध्ये संघात सहभागी करुन घेतलं होतं. तितकीच रक्कम यावर्षी मुंबई इंडियन्सकडून त्याला दिली जाणार आहे.

# संस्कार 'च्या विद्यार्थ्यांनी जाणून घेतली क्षेत्रभेटीतून उद्योगांची माहिती



**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरातील संस्कार प्रबोधिनी माध्यमिक विद्यालयातील इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांनी क्षेत्रभेटीच्या माध्यमातून शहरातील ॲप्राक्रॉप,ॲप्राकुल ए सी(वातानुकूलन) कारखान्याला भेट देऊन उद्योग क्षेत्राची प्रत्यक्षात माहिती जाणून घेतली. संस्कार प्रबोधिनी माध्यमिक विद्यालयाने विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कारखान्यात नेऊन उद्योग क्षेत्राची माहिती देऊन अनोखा उपक्रम राबवला आहे.

यामध्ये विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष एसी कसा तयार होतो, त्यासाठी कोणकोणत्या वस्तूंचा वापर होतो,या संदर्भातील सविस्तर माहिती कारखान्याला भेट देऊन जाणून घेतली.ए सी मध्ये मोठ्या प्रमाणावर तांबे वापरल्या जाते,कारण तांबे खराब होत नाही,आणि त्याला गंज लागत नाही. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर तांब्याचा वापर एसी मध्ये केला जातो. शहरातील ॲप्राक्रॉप,ॲप्राकुल कंपनी भारतातील गोदरेज,एलजी, व्होल्टास अशा नामांकित कंपन्यांना मोठ्या प्रमाणावर ए सी तील सर्व सुटे भाग पुरवतात. तसेच रेल्वेतील ए सी,आणि मोठ्या ठिकाणी आठटना पेक्षा मोठ्या ए सी तील सर्व सुटे भाग याच कारखान्यातून पुरवल्या जातात.शहरातील ए सी तयार करणार्या कंपनीत प्रत्यक्षात एसी तयार करताना बघून विद्यार्थी भारावले होते. कंपनीचे प्रमुख उद्योगपती जितेंद्र राठी,व्यवस्थापक मारुती कल्याण कस्तुरे, दशरथ फड, एजाज मनियार आणि कंपनीतील अभियंते यांनी विद्यार्थ्यांना ए सी संदर्भातील सर्व माहिती दिली.विद्यार्थ्यांनी अनेक प्रश्न विचारून माहिती घेतली. या क्षेत्रभेटी चे आयोजन उपक्रमशील शिक्षक रामदास कुलकर्णी, घनश्याम माळी,शरयू देशमुख यांनी केले होते.या उपक्रमाचे संस्थेचे अध्यक्ष सुरेश कुलकर्णी, विजय देशमुख, प्रा. केशरसिंह बगेरिया, विनायकराव देशपांडे, भास्करराव काळे, मु.अ.ईश्वर वाघ व सुजाण पालकांनी कौतुक केले आहे.


प्रत्यक्षात एसी तयार करताना बघून विज्ञानाची गोडी निर्माण झाली विद्यार्थी सोहम बोंदरवाल,कुलकर्णी सरांनी कारखाना आणि एसी मधील माहिती आम्हाला करून दिल्याने उद्योग क्षेत्राची माहिती झाली, असे विद्यार्थिनी अश्विनी मुळे म्हणाली.

# जिल्हा रुग्णालयात धुळखात पडून असलेली एमआरआय मशीन कार्यान्वित करा - देशमुख

## मराठा महासंघाचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना साकडे

**जालना । प्रतिनिधी -** जिल्हा सामान्य रुग्णालयासाठी शासनाच्या निधीतून अत्याधुनिक एमआरआय मशीन प्राप्त होऊन वर्ष उलटले असतानाही ते अद्याप कार्यान्वित झालेले नाही. या गंभीर निष्क्रियतेविरोधात मराठा महासंघाने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे निवेदन सादर करत तात्काळ मशीन कार्यान्वित करण्याबाबत साकडे घातले.

उपमुख्यमंत्री शिंदे हे बुधवार दि. १२ नोव्हेंबर रोजी जालना दौऱ्यावर असताना मराठा महासंघाचे राष्ट्रीय विभागीय चिटणीस अरविंद देशमुख, जिल्हा कोषाध्यक्ष अशोक पडूळ, जिल्हा उपाध्यक्ष रोहित देशमुख, सुदर्शन देशमुख त्यांची भेट घेऊन दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, जालना जिल्हा रुग्णालयात लाखो रुपयांची अत्याधुनिक एमआरआय यंत्रसामग्री आजही धुळखात पडली आहे. शासनाने सर्वसामान्य जनतेला मोफत सुविधा मिळावी या हेतूने हे मशीन पुरवले, मात्र वर्षभर झाले तरी कार्यान्वयन न झाल्याने गरीब रुग्णांना खाजगी रुग्णालयांत ६ ते ८ हजार रुपये देऊन तपासणी करावी लागत आहे. हे शासनाच्या उद्दिष्टांना हरताळ फासणारे आहे. मशीनच्या उद्घाटनात राजकीय कारणे वा खाजगी केंद्रांचा दबाव अडथळा ठरत असल्याची माहिती स्थानिक पातळीवर मिळत आहे. जर हे सत्य असेल, तर हा प्रकार गोरगरिबांच्या आरोग्याशी अन्याय करणारा आहे. शासनाच्या निधीतून घेतलेल्या यंत्रसामग्रीचा उपयोग न होणे ही प्रशासनाच्या विश्वासार्हतेस बाधक गोष्ट आहे, असे महासंघाने नमूद केले.



आपल्या नेतृत्वाखाली राज्यातील आरोग्यसेवा अधिक सक्षम होत आहे. जालना जिल्हा रुग्णालयातील एमआरआय मशीन आपल्या हस्तक्षेपाने त्वरित सुरू झाले, तर जनतेला मोठा दिलासा मिळेल. लवकरात लवकर एमआरआय मशीन कार्यान्वित झाले नाही, तर लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलनाचा पर्याय स्वीकारावा लागेल, असा इशारा या निवेदनात देण्यात आला आहे.

### स्व. अण्णासाहेब पाटील महामंडळाची वेबसाईट बंद असल्याकडे वेधले लक्ष

स्व. अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाची वेबसाईट गेल्या दोन महिन्यापासून बंद असल्याने कर्ज प्रकरणे दाखल करता येत नसल्याने महाराष्ट्रातील हजारो युवकांची मोठी अडचण होत आहे. कर्ज प्रकरण प्रक्रिया पूर्णपणे ठप्प झाल्याने यात लक्ष घालून वेबसाईट सुरू करण्यासाठी तातडीने पावले उचलावीत, अशी मागणी यावेळी अरविंद देशमुख यांनी केली.



# क्रांतिकारकांचे गुरू वस्ताद लहुजी साळवे

स्वातंत्र्य संग्रामातील एक जहाल क्रांतिकारक तसेच क्रांतिकारकांरांचे गुरू वस्ताद लहुजी साळवे यांची जयंती. भारतमातेला इंग्रजांच्या जोखडातून मुक्त करण्यासाठी लाखो ज्ञात अज्ञात क्रांतिकारकांनी हौतात्म्य पत्करले त्यात वस्ताद लहुजी साळवे यांचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. वस्ताद लहुजी साळवे यांनी भारतमातेला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी जे महान कार्य केले त्या कार्याची नोंद भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात सुवर्ण अक्षरांनी घ्यायला हवी होती मात्र दुर्दैवाने त्यांच्या कार्याची दखल इतिहासकरांनी घेतली नाही म्हणूनच त्यांच्या कार्याविषयी देशातील खूपच कमी लोकांना माहिती आहे. वस्ताद लहुजी साळवे यांचा जन्म १४ नोव्हेंबर १७९४ रोजी पुरंदर किल्ल्याच्या पायथ्याशी असलेल्या पेठ या गावी झाला. त्यांच्या वडिलांचे नाव राघोजी साळवे ( राऊत ) तर आईचे नाव विठाबाई असे होते. लहुजी साळवे यांचा जन्म शूरवीरांच्या घरात झाला. त्यांचे खापर पणजोबांवर शिवाजी महाराजांनी पुरंदर किल्ल्याच्या रक्षणाची जबाबदारी दिली होती. त्यांचे वडील राघोजी साळवे हे दुसऱ्या बाजीरावाच्या काळात शिकारखाना व शस्त्रागाराचे प्रमुख होते. लहुजींचे घराणे शूरवीर, लढवय्ये असल्याने लहुजीने देखील शूर बनावे अशी त्यांच्या वडिलांची इच्छा होती म्हणूनच त्यांनी लहुजींना लहानपणापासूनच शस्त्रांची आणि युद्ध कलेची तालीम दिली. त्यामुळे लहुजी घोडेस्वारी करणे, दांडपट्टा फिरवणे, भालाफेक करणे, बंदूक चालवणे, तोफगोळे फेकणे, गनिमीकावा करणे, शत्रूंची गुप्त माहिती गोळा करणे या युद्ध कलांत पारंगत झाले. ५ नोव्हेंबर १८९७ रोजी पेशव्यांचे इंग्रजांसोबत घनघोर युद्ध सुरू झाले. या युद्धात राघोजींसोबत तरुण लहुजीही सहभागी झाले. या युद्धात राघोजी लहुजी या बापलेकांनी प्रयत्नांची शर्थ केली मात्र या युद्धात राघोजींना वीरमरण आले. या युद्धात पेशव्यांचा पराभव झाला. वडिलांना वीरगती प्राप्त झाल्यावर लहुजींच्या हृदयात स्वातंत्र्य प्राप्तीची ज्वाला भडकली. भारतमातेला इंग्रजांच्या गुलामीतून मुक्त करण्यासाठी राघोजी साळवे शाहिद झाले त्या ठिकाणीच लहुजींनी १७ नोव्हेंबर १८१७ ला आपल्या वडिलांना श्रद्धांजली अर्पण करतना मरेन तर देशासाठी आणि जगेन तर देशासाठी अशी शपथ घेतली. इंग्रजांशी लढायचे असेल तर त्यासाठी जहालच व्हावे लागेल हे ओळखून त्यांनी तरुणांना जागृत केले. लहुजी साळवे यांनी पुण्यातील मुलांना युद्ध कलेचे शिक्षण देण्यासाठी पुण्यतिल रास्ता पेठेत देशातील पहिले तालीम युद्ध कौशल्य प्रशिक्षण केंद्र सुरू केले. या प्रशिक्षण केंद्रात सर्व समाजातील तरुण सहभागी झाले. १८३९ साली इंग्रजांनी सातारचे छत्रपती प्रतापसिंह यांना गादीवरून हटवले. छत्रपती प्रतापसिंह यांना पदच्युत केल्याने तरुणांमध्ये इंग्रजांविरुद्ध चीड निर्माण झाली. याचा वचपा काढण्यासाठी तात्या टोपे, नानासाहेब पेशवे यांनी महाराष्ट्रात तर उत्तरेत रंगोबापू यांनी लहुजींच्या मदतीने इंग्रजांविरुद्ध बंड पुकारले. १२ जून १८५७ ही बंडाची तारीख निश्चित करण्यात आली. मात्र बंडाची कुणकुण इंग्रजांना लागली व त्यांनी लहुजींसह अनेक क्रांतिकारकांना पकडले मात्र त्यामुळे इतर क्रांतिकारक चिडले व त्यांनी पुरंदरच्या मामलेदारांना ठार मारले. मामलेदारांच्या हत्येला जबाबदार ठरवून इंग्रजांनी कनय्या मांग व धर्मा मांग यांना तोफेच्या तोंडी दिले हे दोघेही लहुजीचे शिष्य होते. याच हत्येला जबाबदार ठरवून आणखी काही क्रांतिकारकांना फाशीची शिक्षा सुनावण्यात आली. या क्रांतीकारकांना लहुजी साळवे यांनीच प्रशिक्षण दिले असा संशय असल्याने इंग्रजांनी लहुजी साळवे यांना अटक करण्यासाठी त्यांच्या पाठीमागे पोलिसांचा ससेमिरा लावला. पोलिसांचा ससेमिरा चुकवण्यासाठी लहुजी साळवे हे वेषांतर करून भ्रमंती करू लागले या काळात त्यांनी सातारा, पन्हाळा या ठिकाणच्या दुर्गम भागात प्रशिक्षण केंद्र उभारली. या प्रशिक्षण केंद्रातून त्यांनी अनेक क्रांतिकारक तयार केले. १७ फेब्रुवारी १८८१ रोजी पुण्यातील संगमपूरच्या परिसरात एका झोपडीवजा घरात लहुजींची प्राणज्योत मालवली आणि एका महान क्रांतीपर्वाचा शेवट झाला. भारत मातेला इंग्रजांच्या गुलामीतून मुक्त करण्यासाठी वस्ताद लहुजी साळवे शेवटच्या श्वासापर्यंत लढले आणि आपल्या सारखेच हजारो जहाल क्रांतिकारक निर्माण केले म्हणूनच त्यांना क्रांतिकरांचे गुरू असे म्हणतात. आज त्यांचा स्मृतिदिन मात्र आजही त्यांच्या कार्याची ओळख नव्या पिढीला नाही हे आपले दुर्दैव. अर्थात याला आपले इतिहासकार देखील तितकेच जबाबदार आहेत त्यांनी वस्ताद लहुजी साळवे यांचे कार्य आजच्या पिढीपर्यंत पोहचवले नाही. वस्ताद लहुजी साळवे यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे**

# डॉ आंबेडकरांचा शिका, संघटित व्हा अन् संघर्ष करा हा प्रगतीचा खरा मुलमंत्र - डॉ. देशमुख

**विशाल देशमुख**

**जाफराबाद -** येथील सिद्धार्थ कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा शाळेतील पहिला दिवस ७ नोव्हेंबर विद्यार्थी दिवस म्हणून साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.रमेश देशमुख होते तर उपप्राचार्य प्रा.विनोद हिवराळे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी उपस्थित विद्यार्थ्यांना मौलिक मार्गदर्शन करतांना प्राचार्य डॉ.रमेश देशमुख म्हणले की, शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा हाच खरा प्रगतीचा मूलमंत्र डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी दिला. शिक्षणाशिवाय प्रगतीचा वेगळा मार्ग असुच शकत नाही,म्हणून विद्यार्थ्यांनी जीवनात शॉर्टकट न वापरता शिक्षणाच्या प्रवाहात कितीही अडचणी आल्या तरी त्यावर मात करायची जिद्द असणे हेच खरा विद्यार्थीधर्म आहे आणि याचा आदर्श म्हणाजे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवनकार्य आपल्या डोळ्यासमोर कायम असले पाहिजे.७ नोव्हेंबर १९०० हा दिवस भारतीय समाजाच्या इतिहासातील एक प्रेरणादायी क्षण ठरला. या दिवशी साताऱ्यातील प्रतापसिंग प्राथमिक शाळेत छोट्या 'भिवा'ने (बाबासाहेबांचे बालपणातील नाव) पहिल्यांदा शाळेची पायरी चढली. त्या बारक्या पावलांनी केवळ शाळेकडे नव्हे, तर एका नव्या युगाच्या दिशेने वाटचाल केली. म्हणूनच आजचा दिवस 'डॉ.बाबासाहेब आंबेडकर विद्यार्थी दिवस' म्हणून साजरा केला जातो.शाळेच्या रजिस्टरमध्ये १९१४ साली असलेली बाल भिवाची स्वाक्षरी आजही जपलेली आहे. हा इतिहासाचा मौल्यवान पुरावा आहे. वर्गाबाहेर बसून शिक्षण घेणारा आणि पाण्याच्या एका घोटासाठीही वंचित असलेला तोच विद्यार्थी पुढे अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठात सर्वोत्कृष्ट विद्यार्थी ठरला. हा प्रवास म्हणजे शिक्षणाच्या शक्तीचा पुरावा आहे.

२०१७ साली शालेय शिक्षण विभागाने शासन निर्णयाद्वारे ७ नोव्हेंबर हा दिवस दरवर्षी 'विद्यार्थी दिवस' म्हणून साजरा करण्याचे निर्देश दिले. या दिवशी शाळांमध्ये डॉ.आंबेडकरांच्या जीवनावर आधारित निबंध, वक्तृत्व आणि कविता वाचन स्पर्धा आयोजित करून विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले जाते. आजच्या डिजिटल युगात माहिती सहज मिळते, पण ज्ञानाचा दीप जपणे ही खरी जबाबदारी आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा शिक्षणप्रवास प्रत्येक विद्यार्थ्यासाठी प्रेरणेचा दीपस्तंभ ठरतो असे विस्तृत मार्गदर्शन अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ.रमेश देशमुख यांनी केले. कार्यकमास महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा.भालचंद्र येवले यांनी केले तर आभार डॉ.प्रमोदसिंह राजपूत यांनी मानले.

# पुण्यातील नवले पुलावर भीषण अपघात

**पुणे -** शहरातील नवले पुलावर झालेल्या भीषण अपघातात ९ जणांचा मृत्यू झाला असून १५ जण जखमी असल्याची माहिती आहे. अपघातानंतर स्थानिकांच्या मदतीने जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. एका ट्रकचा ब्रेक फेल झाल्याने तो ट्रक इतर वाहनांना घेऊन एका कंटनेवर जाऊन आदळला. त्यामुळे, घटनास्थळी कारमधील सीएनजीचा स्फोट होऊन आग लागल्याची भीषण दुर्घटना घडली. या घटनेचा व्हिडिओ पाहिल्यानंतर अपघाताची दाहकता लक्षात येते. पोलीस व अग्निशमन दलाने घटनास्थळी धाव घेत मदत व बचावकार्य केले.

# स्वामी विवेकानंद विद्यालय बुटखेडा येथे युनायटेड ग्लोबल फेडरेशन तर्फे बॅग वाटप

**विशाल देशमुख**

**टेंभूर्णी -** युनायटेड ग्लोबल फेडरेशन मार्फत सुरू असलेल संफुर्ण महाराष्ट्र मधी २५०० बॅग वाटप उपक्रम मार्गात आज गरजू विद्यार्थ्यांना शालेय बॅग वाटप कार्यक्रम स्वामी विवेकानंद विद्यालय बुटखेडा इथे आज १२ नोव्हेंबर रोजी जिल्हा स्वामी विवेकानंद शाळा बुटखेडा येथे युनायटेड ग्लोबल फेडरेशन यांच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी शालेय बॅग वाटप कार्यक्रम उत्साहात पार पडला या उपक्रमात शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना मोफत शालेय बॅगा देण्यात आल्या विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद आणि समाधान झळकत होते

या कार्यक्रमास युनायटेड ग्लोबल फेडरेशन चे चेअरमन श्री. दुर्गेश बनकर, भागवत लोखंडे, उमेश गिराम हे मान्यवर विशेष उपस्थित होते.

कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांशी संवाद साधताना श्री. दुर्गेश बनकर यांनी शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करत सांगितले की ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याची मदत करून शिक्षणाबद्दलची ओढ वाढवणे हीच आमची सामाजिक जबाबदारी आहे.

शाळेचे मुख्याध्यापक ए.बी. बनकर सर व आर.डी.देशमुख सर. सानप सर यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले आणि संस्थेच्या या सामाजिक कार्याचे मनापासून कौतुक केले गावातील पालकवर्ग व सामाजिक कार्यकर्तेही कार्यक्रमाला उपस्थित होते. समारोपाच्या वेळी सर्वांनी एकमताने सांगितले की शिक्षण हाच सर्वोत्तम दान असून अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये शिकण्याची उर्मी आणि आत्मविश्वास वाढतो.






# मोती तलाव परिसरात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते जलकुंडाचे लोकार्पण



**जालना । प्रतिनिधी -** जालना शहराच्या मोती तलाव परिसरात राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शुभहस्ते १९ कोटी रुपये खर्चून बांधण्यात आलेल्या अत्याधुनिक आणि भव्य जलकुंडाचे लोकार्पण समारंभ मोठ्या उत्साहात पार पडला. या प्रकल्पाने शहरातील नागरिकांच्या दीर्घकाळ प्रलंबित मागणीची पूर्तता करत धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यांसाठी सुरक्षित व पर्यावरणपूरक व्यवस्था उपलब्ध करून दिली आहे.

काल रात्रीच्या सुमारास पार पडलेल्या या लोकार्पण सोहळ्यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे आगमन होताच त्यांचे क्रेनच्या सहाय्याने फुलांचा विशाल हार घालून भव्य स्वागत करण्यात आले. परिसरात आकर्षक विद्युत रोषणाई, सजावट आणि भगवा झेंडा फडकत असल्याने सोहळ्याला एक अद्वितीय वैभव लाभले होते.

यावेळी आमदार अर्जुन खोतकर यांनी उपमुख्यमंत्री शिंदे यांना जलकुंड प्रकल्पाची सविस्तर माहिती देत, नागरिकांच्या धार्मिक आणि सामाजिक गरजा लक्षात घेऊन या प्रकल्पाची संकल्पना कशी साकारली याचे विवेचन केले. त्यांनी सांगितले की, गणेश विसर्जन, दुर्गामाता विसर्जन तसेच छठपूजेच्या विधींसाठी या जलकुंडाचा उपयोग होणार असून, यामुळे पर्यावरण प्रदूषण टाळत सुरक्षित व सुसज्ज जागा नागरिकांना उपलब्ध झाली आहे.

**१९ कोटींच्या भव्य प्रकल्पाची वैशिष्ट्ये -** अत्याधुनिक जलशुद्धीकरण यंत्रणा, सुरक्षित उतरणीची पायऱ्या व रेलिंग्स, पाण्याची पातळी नियंत्रित ठेवणारी स्वयंचलित व्यवस्था, कचरा संकलन आणि फिल्टरिंग यंत्रणा, सुंदर बाग आणि बसण्याची सोय

**एलईडी प्रकाशयोजना आणि सीसीटीव्ही प्रणाली**

या लोकार्पण सोहळ्याला जालना शहराचे आमदार अर्जुन खोतकर, आमदार हिकमतदादा उडाण, शिवसेना शिंदे गटाचे जिल्हा प्रमुख भास्कर आंबेकर, तसेच विविध राजकीय, सामाजिक संस्थांचे मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिवसेना कार्यकर्त्यांनी भगवे झेंडे फडकवत घोषणाबाजी करत उपमुख्यमंत्री शिंदे यांचे स्वागत केले.

शिंदे यांनी आपल्या भाषणात सांगितले की, जालना शहर हे वेगाने प्रगती करणारे शहर आहे. आमदार अर्जुन खोतकर यांच्या प्रयत्नांमुळे नागरिकांच्या धार्मिक आणि पर्यावरणपूरक मागणीची आज पूर्तता झाली आहे. राज्य सरकारच्या विकासदृष्टीत जालना शहराला प्राधान्य मिळत राहील.

या जलकुंडामुळे शहरातील धार्मिक विधी सुरक्षित, सुसज्ज आणि स्वच्छ वातावरणात पार पडतील, तसेच तलाव व इतर जलाशयांवर होणारा विसर्जनाचा ताण कमी होईल. या प्रकल्पामुळे मोती तलाव परिसर नव्या पर्यटन स्थळाच्या स्वरूपात विकसित होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. कार्यक्रमाच्या अखेरीस शहरातील विविध सामाजिक संघटनांनी आमदार अर्जुन खोतकर आणि उपमुख्यमंत्री शिंदे यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन गौरव केला. उपस्थित नागरिकांनीही या ऐतिहासिक क्षणाला उत्स्फूर्त प्रतिसाद देत जय महाराष्ट्र च्या घोषणा दिल्या. या भव्य प्रकल्पामुळे जालना शहराच्या धार्मिक, सामाजिक आणि पर्यावरणीय विकासाला नवी दिशा मिळाली असून, नागरिकांनी या प्रकल्पाचे एकमुखाने स्वागत केले आहे.

# धार्मिक उपक्रमांमुळे गावात एकोपा व संस्कारात वाढ होते - भास्कर दानवे

## लोंढेवाडी येथे भागवत कथा ज्ञानयज्ञ व ज्ञानेश्वरी पारायण सप्ताह उत्साहात संपन्न



**जालना । प्रतिनिधी -** लोंढेवाडी (ता. जालना) येथे (ता.१२) समस्त ग्रामस्थांच्या वतीने आयोजित श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ व ज्ञानेश्वरी पारायण सप्ताह सोहळा मोठ्या भक्तीभावाने व उत्साहात संपन्न झाला. या समाप्तीच्या कार्यक्रमात ह.भ.प. कृष्णाजी महाराज नवले यांनी आपल्या कीर्तनाद्वारे उपस्थित भक्तांना अध्यात्म, भक्ती व संस्कार यांचे मोल सांगितले. यावेळी भारतीय जनता पार्टी जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर दानवे यांनी उपस्थित कीर्तन श्रवण केले व ग्रामस्थांशी संवाद साधला.

भास्कर दानवे यांनी सांगितले की, अशा धार्मिक व सांस्कृतिक उपक्रमांमुळे गावात एकोपा, श्रद्धा आणि संस्कारांची वाढ होते. या माध्यमातून समाजात आपुलकी, सहकार्य आणि सकारात्मकतेचा संदेश पोहोचतो. धर्म, संस्कार आणि समाजसेवा ही एकमेकांशी घट्ट जोडलेली आहेत. समाजाच्या बांधणीसाठी आणि नव्या पिढीपर्यंत भारतीय संस्कृतीचे मूल्य पोहोचवण्यासाठी अशा कार्यक्रमांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. या सप्ताहाचे आयोजन केल्याबद्दल मी सर्व ग्रामस्थ, आयोजक मंडळ आणि कार्यकर्त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करतो.

या प्रसंगी सरपंच निवृत्ती लंके, सखाराम पवार, सखाराम उंबरे, भागवत आवळे, बाबुराव जाधव, दत्तात्रय उंबरे, प्रकाश उंबरे, शिवनाथ लोंढे, बाबुराव पटरे, बबन जाधव, विष्णूबापू डोंगरे, गोवर्धन कोल्हे, सरचिटणीस सुनिल पवार, मौजपुरी सरपंच माऊली उगले, बद्रिनाथ भसांडे, निवृत्ती गायकवाड, तुषार गायकवाड, बाळूभाऊ लोहकरे, सुभाष राठोड, जीवन खुरमुटे तसेच पंचक्रोशीतील व गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# परतूरला तिसरा दिवसही निरंक

**परतूर । प्रतिनिधी -** परतूर नगरपरिषद निवडणुकीसाठी दि. १० ते १७ नोव्हेंबर २०२५ हा कालावधी उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा असून बुधवार दि. १२ नोव्हेंबरपर्यंत अध्यक्ष किंवा नगरसेवक पदासाठी एकही उमेदवारी अर्ज दाखल झाला नसल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी श्रीमती प्रणाली तायडे यांनी दिली.

यासंदर्भात बोलताना श्रीमती तायडे यांनी सांगितले की, नगरपरिषद निवडणुकीसाठी तहसील कार्यालयाची निवडणूक यंत्रणा सज्ज झाली आहे. निवडणुकीचे कामकाज सुरळीत पार पडावे यासाठी विविध कक्षांची स्थापना करण्यात आली आहे. दि. १० ते १७ ही अध्यक्ष आणि नगरसेवक पदासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत आहे. दि. १०,११ व १२ नोव्हेंबर या पहिल्या तीन दिवशी अध्यक्ष किंवा नगरसेवक पदासाठी एकही अर्ज दाखल झालेला नाही.

# जाफ्राबाद शहरात दोन स्वतंत्र पाण्याच्या टाक्यांचे भूमिपूजन

## प्रभाग क्र. १ मधील नागरिकांचा पाण्याचा प्रश्न सुटणार!

**विशाल देशमुख**

**जाफ्राबाद -** शहरातील प्रभाग क्रमांक १ मधील नागरिकांसाठी आजचा दिवस ऐतिहासिक ठरला. नागरिकांच्या मूलभूत गरजांपैकी सर्वात महत्त्वाच्या असलेल्या पिण्याच्या पाण्याच्या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा निघावा यासाठी आज दोन स्वतंत्र पाण्याच्या टाक्यांच्या बांधकामाचे भूमिपूजन उत्साहात पार पडले.

हा उपक्रम महाराष्ट्र राज्य सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत राबवण्यात येत असून, या प्रकल्पाचे मार्गदर्शन केंद्रीय मंत्री मा. रावसाहेब पाटील दानवे आणि दूरदृष्टी आमदार संतोष पाटील दानवे यांची आहे. नगराध्यक्षा सौ. कविता दीपक वाकडे यांच्या शुभहस्ते या कामाचे भूमिपूजन करण्यात आले.

या प्रसंगी नगरसेवक श्री. सुरेशजी दिवटे, भाजप नेते दीपक पाटील वाकडे, उपनगराध्यक्ष राऊप चेअरमन, गौतम शेठ, शेख मुस्ताक, कुरेशी जॅकी भैया, शेख सऊद, शेख कौसर भैया, श्यामभाऊ वैद्य, रवी हिवाळे, अनिल बोर्डे, बाबुराव जाधव सर आदी मान्यवर उपस्थित होते. मोठ्या संख्येने स्थानिक नागरिक आणि कार्यकर्त्यांनी या भूमिपूजन कार्यक्रमात सहभाग घेतला.

**प्रकल्पाचे स्वरूप आणि लाभ**

या योजनेंतर्गत सिद्धार्थ नगर, संभाजीनगर, आणि पुनर्वसन विभाग या तीन भागांसाठी स्वतंत्र पाण्याच्या टाक्या उभारल्या जाणार आहेत. सुमारे दोन कोटी रुपयांचा खर्च असलेल्या या प्रकल्पामुळे जाफ्राबाद शहरातील प्रभाग क्रमांक १ मधील पाणीपुरवठा कायमस्वरूपी सुकर आणि नियमित होणार आहे.

या प्रकल्पामुळे नागरिकांना दिवसातून ठराविक वेळेस स्थिर आणि स्वच्छ पाण्याचा पुरवठा मिळेल. आतापर्यंत नागरिकांना अपुरा दाब, अनियमित वेळापत्रक आणि टंचाईचा सामना करावा लागत होता. परंतु आता या टाक्यांमुळे पाणीपुरवठा अधिक कार्यक्षम आणि वैज्ञानिक पद्धतीने होणार आहे.

**नगरसेवकांचे मत**

आज माझ्या प्रभागात जवळपास दोन कोटी रुपयांच्या विकासकामांना सुरुवात झाली आहे. सिद्धार्थ नगर, संभाजीनगर आणि पुनर्वसन विभागातील पाण्याच्या टाक्यांच्या कामामुळे नागरिकांचा दीर्घकाळचा पाण्याचा प्रश्न कायमचा सुटणार आहे. माझे ध्येय आहे की प्रभाग क्रमांक १ हा जाफ्राबाद शहरातील आदर्श आणि सर्वांगीण विकास झालेला वार्ड म्हणून ओळखला जावा. नागरिकांना प्रत्येक सुविधा देण्यासाठी मी सदैव तत्पर राहीन असे आश्वासन प्रभाग क्रं एकचे नगरसेवक सुरेश दिवटे यांनी दिले.

**नगराध्यक्षा कविता वाकडे यांचे म्हणणे**

नगरपंचायतीच्या माध्यमातून नागरिकांच्या प्रत्येक प्रश्नावर आम्ही ठोसपणे काम करीत आहोत. आजचे भूमिपूजन हे जाफ्राबाद शहराच्या विकासाच्या आणखी एका महत्त्वपूर्ण टप्प्याचे प्रतीक आहे. आमच्या नगरपंचायतीचा प्रत्येक निर्णय नागरिकांच्या हितासाठी आणि विकासाच्या दृष्टीनेच घेतला जातो. असे जाफ्राबादच्या नगराध्यक्ष सौ. कविता दीपक वाकडे यांनी सांगितले.

**नागरिकांची प्रतिक्रिया**

आमच्या भागात पाण्याची टंचाई मोठी समस्या होती. अनेक वर्षांपासून अपुऱ्या पाण्यामुळे आम्ही त्रस्त होतो. आज नगरसेवक सुरेश दिवटे सर आणि नगरपंचायतीच्या प्रयत्नांमुळे हा प्रश्न कायमचा सुटणार आहे. हा उपक्रम आमच्या भागातील नागरिकांच्या आयुष्यातील खऱ्या अर्थाने 'सुवर्ण पान' ठरेल. या दोन नवीन पाण्याच्या टाक्यांच्या उभारणीमुळे जाफ्राबाद शहरातील जलपुरवठा व्यवस्थेत आमूलाग्र सुधारणा होणार असून, नागरिकांना स्वच्छ, नियमित आणि पुरेशा प्रमाणात पाणी उपलब्ध होणार आहे. हा प्रकल्प केवळ विकासाचे प्रतीक नसून, जाफ्राबादच्या नागरिकांच्या जीवनगुणवत्तेत सुधारणा करणारे पाऊल ठरेल.

# श्रीसंत श्रीगुरू अस्तित्वाची जाणीव करून देतात - ह.भ.प .नारायण महाराज पिंपळे

**विशाल देशमुख**

**टेंभुर्णी -** श्रीसंत आणि श्रीगुरु आपल्या अस्तित्वाची जाणीव करून देतात. असे प्रतिपादन ह. भ. प. नारायण पिंपळे यांनी टेंभुर्णी येथील सिद्धिविनायक गणपती संस्थान टेंभुर्णी येथे सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताह मध्ये केले.

मागील २६ वर्षापासून सिद्धिविनायक गणपती मंदिरात अखंड हरिनाम सप्ताह श्री संत ज्ञानेश्वर माऊली समाधी सोहळा व श्री संत रंगनाथ बाबा पुण्यतिथी निमित्ताने आयोजित केला जातो.

याही वर्षी मोठ्या उत्साहाने आणि आनंदाने हा सप्ताह सुरू आहे. या अखंड हरिनाम सप्ताह मध्ये तिसऱ्या दिवशीचे कीर्तन पुष्प ह.भ .प. नारायण महाराज पिंपळे यांच्याकडे सेवा होती.



त्यावेळी महाराजांनी जगद्गुरु तुकोबाराय यांच्या!!न करी रे संग, राही रे निश्चळ !! लागो निधी मळ ममतेचा!! अभंगावर निरूपण केले.

यावेळी महाराज म्हणाले मानवाच्या अस्तित्वाची जाणीव श्री गुरु व श्री संत महात्मे करून देतात. जर श्री संतांच्या वचनावर मानवाने चालण्याचा प्रयत्न केला तर निश्चित मानवाचं जीवन कृतार्थ झाल्याशिवाय राहत नाही. कुणाचा संग करावा, कुणाचा करू नये .आणि संग केल्याच्या नंतर काय प्राप्ती होते, असे तुकोबारायांनी या अभंगातून सांगितले तेच चिंतन महाराजांनी यावेळी केले.

मानवाने इंद्रयावर विजय मिळवला पाहिजे. वासनेचा क्षय केला पाहिजे काम क्रोधावर विजय मिळवला पाहिजे. तरच मानवाच्या जीवनामध्ये ब्रह्मभाव निर्माण झाल्याशिवाय राहणार नाही. व जीवनामध्ये आनंदी आनंद झाल्याशिवाय राहणार नाही. असे श्री संत तुकोबाराय म्हणतात.

या अखंड सप्ताहाचे नियोजन व आयोजन श्री खलसे गुरुजी व टेंभुर्णी पंचक्रोशीतील मंडळी करतात. किर्तन सेवेकरिता उपस्थित ह.भ.प. राजू महाराज जैवाळ, ह.भ.प. संतोष महाराज चव्हाण, गणपत भिताडे गुरुजी,सिद्धेश्वर लंगोटे गुरुजी, विनायक खलसे, विष्णू पिंपळे महाराज,टेंभुर्णी येथील भजनी मंडळी तसेच अकोला देव येथील भजनी मंडळी व काळेगाव येथील भजनी मंडळी उपस्थित होते.

# दहीफळ खंदारे पंचायत समिती गणातुण रामेश्वर भोसले यांच्या उमेदवारीची जोरदार चर्चा

**मंठा । प्रतिनिधी -** तालुक्यातील दहीफळ खंदारे पंचायत समिती आगामी पंचायत समिती निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर दहीफळ खंदारे गणात राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. या पार्श्वभूमीवर रामेश्वर भोसले यांचे नाव प्रबळ दावेदार म्हणून पुढे येत असून, त्यांच्या उमेदवारीची संध्या परिसरात जोरदार चर्चा सुरू आहे. ग्राम विकास, पाणीपुरवठा, शिक्षण, शेती व युवकांच्या प्रश्नांवर सातत्याने काम करणाऱ्या रामेश्वर भोसले यांनी अल्पावधीतच सर्वसामान्य जनतेत चांगली ओळख निर्माण केली आहे. त्यांच्या कार्यतत्परतेमुळे आणि जनसंपर्कामुळे ग्रामस्थ त्यांच्याकडे आशेने पाहत आहेत.



गेल्या काही वर्षांत त्यांनी सामाजिक क्षेत्रात केलेले कार्य, शेतकऱ्यांच्या समस्या सोडवण्यासाठी केलेली धडपड आणि युवकांना प्रोत्साहन देण्यासाठी घेतलेले उपक्रम यामुळे त्यांचा प्रभाव सतत वाढत आहे. स्थानिक राजकीय समीकरणांमध्ये रामेश्वर भोसले हे नाव आता चर्चेचा केंद्रबिंदू ठरले असून, त्यांना विविध समाजघटकांचा वाढता पाठिंबा मिळत आहे. ग्रामविकासासाठी स्पष्ट दृष्टीकोन आणि जनतेशी घट्ट नाळ असलेल्या अशा तरुण नेतृत्वाची आवश्यकता असल्याचे मत स्थानिक नागरिक व्यक्त करत आहेत.

# ऊस वाहतुक करणाऱ्या वाहनांनी रस्ता सुरक्षा नियमाचे पालन करण्याचे आवाहन

**जालना । प्रतिनिधी -** जिल्ह्यातील ऊस वाहतूक सुरक्षिततेसाठी उप प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय, जालना तर्फे महत्त्वपूर्ण उपक्रम राबविण्यात येत आहेत. ऊस वाहतूक करणाऱ्या वाहनांवर रिफ्लेक्टर टेप लावणे, वाहनांवर कर्कश डीजे साऊंड टाळणे तसेच रस्ता सुरक्षा नियमांचे काटेकोर पालन करण्याबाबत सर्व साखर कारखान्यांना मागील आठवड्यात लेखी सूचना देण्यात आल्या आहेत. या सूचनांच्या अनुषंगाने काही कारखान्यांनी तत्काळ अंमलबजावणी सुरू केली असून, बागेश्वरी साखर कारखाना यांनी ऊस वाहतूक करणाऱ्या वाहनांवर रिफ्लेक्टर टेप लावण्याचे काम हाती घेतले आहे. तसेच सुरक्षित ऊस वाहतूक नियमांविषयी माहिती देणारे फ्लेक्स बोर्ड कारखाना परिसरात तसेच वाहनांजवळ लावण्यात येत आहेत.

उप प्रादेशिक परिवहन अधिकारी चंद्रमोहन चिंतल यांनी दिलेल्या सूचनेनुसार, गाळप हंगाम सुरू असलेल्या कारखान्यांकडून नियमांची अंशतः अंमलबजावणी होताना दिसत आहे. जिल्ह्यातील उर्वरित कारखान्यांनीही विलंब न करता सर्व ऊस वाहतूक करणाऱ्या वाहनांवर अनिवार्य रिफ्लेक्टर टेप लावणे, डीजे साऊंडचा वापर प्रतिबंधित करणे आणि सर्व रस्ता सुरक्षा नियमांचे पालन करण्याचे आवाहन केले आहे. जिल्ह्यातील अपघात प्रवण परिस्थिती टाळण्यासाठी वाहतूक विभागाकडून पुढील काळातही नियमितपणे तपासणी व जनजागृती करण्यात येणार असल्याचेही उप प्रादेशिक परिवहन अधिकारी चंद्रमोहन चिंतल यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे कळविले आहे.



हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.